महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/मभाषा/२०२४/4553 दिनांक : 14 NOV 2024

**परिपत्रक –**

**विषय- मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशनाबाबत ---**

संदर्भ- शासन पत्र क्र.संदर्भ क्र.१३४/२०२४/तांशि-५, दिनांक १८ ऑक्टोबर २०२४.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था यांना कळविण्यात येते की, मराठी भाषा विभाग यांनी मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या नियम क्रमांक ९.८ मधील तरतूदीनुसार सर्व व्यवहार मराठी भाषेत करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

तसेच कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाचे सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे किंवा नोंदवहया किंवा जनसंवाद व जनहित यांच्याशी संबधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

"जनहिताय सर्वदा"


महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार भवन, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३५३५ Email ID : tashi5-hted@mah.gov.in


---

क्रमांक :- संदर्भ क्र.१३४/२०२४/तांशि-५. दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग,
पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१.

विषय:- मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्याबाबत.

संदर्भ:- सह सचिव, मराठी भाषा विभाग यांचे दि. ३०/०९/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे. कृपया तिचे अवलोकन व्हावे.

२. संदर्भाधिन पत्राव्दारे सह सचिव, मराठी भाषा विभाग यांनी मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे. तरी, सदर निर्देशाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

Akdoze
18/10/2024

(अजय वि. खर्डे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
12 NOV 2024
आवक क्र. 8916

क्र. १३४/नोंदि/८
१४/१०/२४

मराठी भाषा विभाग
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र : ०२२-२२७९ ४१ ७०

ई-मेल : vaishali.anapat@nic.in

क्रमांक : मभाधो-२०२४/प्र.क्र.८०/भाषा-२ (ई-८२७४९१)

दि. ३०.०९.२०२४

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग/अल्पसंख्यांक विकास विभाग/आदिवासी विकास विभाग/इतर मागास बहुजन कल्याण विभाग/उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग/उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग/उर्जा विभाग/कामगार विभाग/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/कृषी विभाग/ग्रामविकास व पंचायत राज विभाग/गृह विभाग/गृहनिर्माण विभाग/जलसंपदा विभाग/दिव्यांग कल्याण विभाग/नगर विकास विभाग/नियोजन विभाग/परिवहन विभाग/पर्यटन विभाग/पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग/महसूल विभाग/महिला व बालविकास विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/मृद व जलसंधारण विभाग/वन विभाग/वस्त्रोद्योग विभाग/वित्त विभाग/विधि व न्याय विभाग/वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग/शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग/सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग/सामजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग/सामान्य प्रशासन विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/संसदीय कार्य विभाग/सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय - मराठी भाषा धोरणातील तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निदेश देण्याबाबत.

संदर्भ - १. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१
२. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२
३. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. भासस-२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दि. १४.०३.२०२४

महोदय/महोदया,

विभागाच्या दि. १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठी भाषा धोरणास मान्यता देण्यात आली आहे. या धोरणातील नियम क्र. ९.८ मधील तरतुदीनुसार, पुढील तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या आपल्या अधिनस्त कार्यालयांकडून केल्या जाणाऱ्या दस्तऐवजांसह सर्व व्यवहार मराठी भाषेत प्राधान्याने करण्याबाबत निदेश दिले आहेत.

२. महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापराची प्रयोजने निश्चित करण्यात आली आहेत. या अधिनियमातील नियम ३ (फ) नुसार "राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये वापरण्यात यावयाचे सर्व प्रमाणित नमुने, प्रपत्रे किंवा नोंदवह्या किंवा जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणारे इतर कोणतेही दस्तऐवज मराठी भाषेत असणे आवश्यक आहे." तसेच नियम "५अ" नुसार, "या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या दुय्यम आणि प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांसह

E:\आरती\भाषा २\मराठी भाषा धोरण\प्र.क्र.८० २०२४ मुद्दा क्र. ९.६, ९.८ आणि ९.९.docx

DTE/MSBTE ला अग्रेषित

राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी यथोचित तरतुदी करील." अशी तरतूद करण्यात आली आहे.

३. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ मधील नियम क्र. ३ (१) मध्ये राज्य शासनाची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा त्याने निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय, निमशासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या प्रशासकीय कामकाजातील मराठी भाषेच्या वापराची प्रयोजन निश्चित करण्यात आली आहेत. तसेच, नियम क्र. ४ नुसार ही कार्यालये या अधिनियमातील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, जनसंवाद व जनहित यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व मंत्रालयीन विभाग आणि क्षेत्रिय कार्यालये त्यांच्या धोरणांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी सुयोग्य तरतुदी करतील असे निदेश देण्यात आले आहेत.

४. उपरोक्त नमूद तरतुदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आवश्यक सूचना देण्याची विनंती आपणास करण्यात येत आहे.

आदरपूर्वक,

आपला विश्वासू,

(डॉ. नामदेव भोसले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई
२. व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), नवी मुंबई
३. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)
५. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी)
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी) व त्यांच्या अन्य तीन सह कंपन्या
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी)
९. सर्व शासकीय/निमशासकीय कंपन्या, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे इत्यादी
यांना आवश्यक त्यापुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

प्रत : निवड नस्ती /कार्या.भाषा-२